# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी – 22620601/22690602/22641150/22641151 फॅक्स - 2269 2102.
E-Mail: desk2a@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.dtemaharashtra.gov.in


क्रमांक: २अ/एडीएम/२०१८/ ११०६
दिनांक : 10 SEP 2018

प्रति,

सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपुर

**विषय :-** शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रक्रियेची माहिती सादर करणे, प्रवेशित विद्यार्थ्यांची प्रवेश पडताळणी व प्रवेश मान्यतेची प्रक्रिया ....

संदर्भ : मा.सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण यांचे पत्र क्रमांक संकीर्ण / प्र.क्र.१७०/प्रनिप्रा/१२२, दिनांक ५.९.२०१८

वरील विषयाबाबत कळविण्यात येते की, महाराष्ट्र विनाअनुदानीत खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम २०१५ मधील कलम ९(५) च्या तरतूदीनुसार प्रवेश नियामक प्राधिकरण व प्रत्येक विनाअनुदानीत संस्था यांनी प्रवेशाबाबत पार पाडण्यात येणारी कार्ये नमूद केली आहेत. या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रक्रियेची माहिती सादर करणे, प्रवेशित विद्यार्थ्यांची प्रवेश पडताळणी व प्रवेश मान्यतेची प्रक्रिया संपूर्ण ऑनलाईन पध्दतीने राबविण्यात येणार असल्याचे प्रवेश नियामक प्राधिकरणाने संदर्भाधीन पत्रान्वये कळविले आहे.

प्राधिकरणाने कळविल्यानुसार http://www.safalta.org या संकेतस्थळाच्या लिंकवर खाजगी व विनाअनुदानीत व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थांनी दिनांक ६.९.२०१८ ते ३०.९.२०१८ पर्यंत " नोंदणी प्रक्रिया " (निशुल्क) करणे अनिवार्य आहे. तसेच प्रवेशित विद्यार्थ्यांची माहिती व आवश्यक प्रमाणपत्रे/ कागदपत्रे प्राधिकरणाच्या पोर्टलवर सादर करणे तसेच "प्रक्रिया शुल्क " अदा करणे ही प्रक्रिया महाविद्यालयांनी दिनांक १५.९.२०१८ ते १५.१०.२०१८ पर्यंत पूर्ण करणे आवश्यक राहिल. सदर प्रक्रियेकरिता मुदतवाढ देण्यात येणार नाही.

विहीत कालावधीत ज्या संस्था " नोंदणी प्रक्रिया " करण्यास असमर्थ ठरतील त्यांच्या शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या मान्यतेच्या अनुषंगाने भविष्यात कोणताही अनुचित प्रकार घडल्यास त्यास सर्वस्वी महाविद्यालय/संस्था जबाबदार राहील असे प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी संदर्भाधीन पत्रान्वये कळविले आहे.

आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांच्या निदर्शनास सदरहू बाब आणण्यात यावी.

सहसंचालक ... शिक्षण
... नागपूर
... २५२३
11 SEP 2018

(डॉ.अभय वाघ)
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

---

पृ.क्र.तंशिस/प्राकाना/शैवि/2018/ 3038
सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, नागपूर
दिनांक:- 11 SEP 2018

प्रति,

प्राचार्य,
सर्व पदवी, पदव्युत्तर पदवी संस्था,
नागपूर विभाग, नागपूर

यांना कळविण्यात येते की, उपरोक्त पत्रात नमुद केल्यानुसार शै.वर्ष 2018-19 मधील प्रवेशित विद्यार्थ्यांची माहिती प्राधिकरणाने कळविलेल्या http://www.safalta.org या संकेतस्थळावर विहिती मुदतीत नोंदणी प्रक्रिया करणे व प्रक्रिया शुल्क भरण्याची कार्यवाही करावी.

(गुलाबराव ठाकरे)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर